**फौजदारी किरकोळ अर्ज क्र. १८/२०२४** **<u>निशाणी १२ वर पुढे सुरू</u>**

**<u>सरतपासणी अर्जदारातर्फे सुविद्य विधीज्ञ श्रीमती एस.एस. जैनवार यांचेकडुन</u>**

१. शपथपत्रातील मजकुर खरा असुन त्यावर माझी सही आहे. निशाणी क्र.४ सोबत दाखल केलेले दस्त क्र.१ व २ तसेच नि.क्र.१४ सोबत दाखल केलेले दस्त क्र.१ दसतऐवज अर्जदार क्र.२ चे शाळेचे तसेच टयुशन फिस भरलेले दस्त आहे. त्यास **नि.क्र.ए–१७, ए–१८ व ए–१९** देण्यात येते.

<u>सरतपास पुर्ण.</u>

**<u>उलटतपासणी गैरअर्जदारातर्फे सुविद्य विधीज्ञ श्री. ढोके वकिल मॅडम यांच्या तर्फे.</u>**

२. माझे शिक्षण बि.ए. पदवी पर्यंत झालेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी शिवण क्लासेस शिकलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी ब्युटी पार्लरचा कोर्स केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खुप छान मॅकअप करतो. हे म्हणणे खरे नाही की, मी छान मॅकअप करतो म्हणुन मला लग्नामध्ये मॅकअप करण्यासाठी ऑर्डर भेटतात. हे म्हणणे खरे नाही की, मी घरी ब्युटी पार्लर टाकलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मला शिवण काम येते त्यामुळे मी कपडे शिवण्याचे काम करतो. हे म्हणणे खरे नाही की, मी ब्युटी पार्लर आणि कपडे शिवण्याचे काम करून माझे स्वत:चे खर्च काढतो. हे म्हणणे खरे नाही की, माझे शिक्षण बि.ए. पदवी पर्यंत झाले आहे, त्यामुळे मी लहान मुलांची टयुशन क्लासेस घेतो. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदार काही काम करत नाही. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदारची आई नेहमी बिमार राहते. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदारावर त्याची आईची संपुर्ण जबाबदारी आहे. साक्षदार स्वत:हुन सांगते की, गैरअर्जदाराची आई ग्राम पंचायतमध्ये सेविका आहे व ती आता सेवानिवृत झाली असेल. हे मला माहित नाही की, गैरअर्जदाराला बि.पी. व शुगरचा आजार आहे. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदार मजुरीचा काम करतो. हे म्हणणे खरे आहे की, गैरअर्जदाराची वाढीव उत्पन्नबाबत काही दसतऐवज दाखल नाही. हे म्हणणे खरे नाही की, कोणतेही महंगाई वाढ झालेली नाही. हे

म्हणणे खरे नाही की, नि.क्र. ए–१७, ए–१८ व  ए–१९ शाळेच्या प्राध्यापकाला भेटुन किंमत जास्त करून तयार केले आहे.   हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदाराला जानुनबुजुन त्रास देण्याच्या उददेशना खोटी केस दाखल केली आहे व आज न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

**फेरतपासणी नाही.**

दिनांक ०५.०७.२०२५

**श्रवणोत्तर स्वीकृती** **समक्ष**

Digitally signed by SAJIDUZZAMAN SHAHID Date: 2025.07.05 13:45:39 +0530

Digitally signed by SAJIDUZZAMAN SHAHID Date: 2025.07.05 13:45:44 +0530

**[एस.एम.एच.शाहिद]**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, अहेरी**

**[एस.एम.एच.शाहिद]**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, अहेरी**